परवानगी वर्ष : २००९-१०
माध्यम : इंग्रजी.
कायम विना अनुदान

२६३५९/६०

जा.क्र. माध्य.३(१२)/प्रथम मान्यता/पुवि/२०० ९-१०/
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 15 OCT 2009

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

विषय : प्रथम मान्यता. . . इ. ८ वीच्या वर्गास [ २००९-२०१० ]

संदर्भ : १. आपले पत्र क्रमांक- शिक्षण/माध्य/ह-४/दि. ९/१०/०९
२. शा.प.क्र. नमाशा- २००९/[७१७/२००९]/माशि-१ दि. २४/८/०९
३. कार्यालयाचे पत्र क्रं. माध्य-३/१२/८/नमाशा/पुवि/०९-१० दि. ८/१०/०९

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, एरंडवणा, पौडरोड, पुणे-३८ संस्थेच्या इंग्लिश मिडीयम सेकंडरी स्कुल, खराडी, पुणे-१४ माध्यमिक शाळेच्या इयत्ता आठवी च्या वर्गास २०० ९२०१० या शैक्षणिक वर्षासाठी जून २०० ९ पासून कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्ततेस अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करित आहे किंवा कसे ? याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

१. संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी..
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तींची नेमणूक करावी..
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी..
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी..
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे..
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी..
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत..
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात..
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे..
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत..
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी..
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी..
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी..
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी..

( क्रमशः पान २ )

१६. विद्यार्थी संख्या वाढवावी..

१७. जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी..

१. शाळांमध्ये सहा महिन्यांच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३. शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे..

४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील.

५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building Code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी / कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी..

संदर्भ- १. शासन पत्र क्रमांक-याचिका-२००९/प्र.क्र.२४४/प्राशि-४/ दि.१९ सप्टेंबर, २००९.

२. संचालनालयाचे पत्र क्र.संकीर्ण-२००९/६४११६/याचिका/१५ क(८) ९३४४, दि.२४ सप्टेंबर, २००९.

स्थळ प्रतीवर मा.शि.उ.सं. यांची सही असे.

(बा.मु.ओव्हाळ)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१(क्रिरि२)

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी

१. मुख्याध्यापक,

इंग्लिश मिडीयम सेकंडरी स्कुल, खराडी,
पुणे-१४.

२. निवडनस्ती